सावजी बँक

SAWJI BANK

# सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑप. बँक लि ; जिंतूर

**मुख्य कार्यालय :** ए.पी.एम.सी. मार्केट यार्ड, जिंतूर-431509 जि. परभणी । Website : www.sundarlalsawjibank.com

# जाहीर सूचना (सर्व ग्राहकांसाठी)

## बँकेतील आपल्या खात्यासाठी KYC कागदपत्रांसह Mobile, E-mail ID, नामांकन अद्यावत करणे तसेच लॉकर वापराबाबतच्या सूचना

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे तसेच Prevention of Money Laundering Act 2002 (as amended) मधील तरतूदीनुसार, बँक मागणी करेल त्यावेळी तसेच खाली नमूद विशेष बाबतीत KYC संबधी अद्यावत कागदपत्रे बँकेत सादर करणे बंधनकारक आहे.

**Inoperative Account (निष्क्रिय खाते):** आपल्या खात्यामध्ये सलग 2 वर्षापर्यंत कोणतेही ग्राहक प्रेरित व्यवहार झालेले नसतील तर असे खाते Inoperative Account (निष्क्रिय खाते) या वर्गवारीत संबोधले जाते. सदर खाते कार्यान्वित करण्यासाठी शाखास्तरावर उपलब्ध खाते सक्रिय करण्याचे फॉर्म पूर्ण भरुन अद्यावत KYC कागदपत्रांसह आपल्या शाखेत सादर करावे तसेच खाते सक्रिय करून घेऊन त्यामध्ये किमान 1 व्यवहार करावा.

**Updation of Mobile No. / E -Mail ID / Nomination :** आपल्या खात्यामध्ये होणाऱ्या प्रत्येक व्यवहारासंबंधीत अद्यावत माहिती आपणास उपलब्ध होणेसाठी आपल्या खात्यामधील संपर्क क्रमांक अद्यावत आहे या बाबत आपल्या नजीकच्या शाखेस भेट देऊन खात्री करून घ्यावी. तसेच अद्यावत नसल्यास Mobile क्रमांक नोंदणीकृत करून घ्यावा. वेळप्रसंगी संपर्क करणेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून आपला e -mail ID बँकेमध्ये नोंदणीकृत करून घ्यावा. आपल्या सर्व प्रकारच्या ठेव खात्यास व लॉकर खात्यास (लागू असल्यास) नामनिर्देशन अद्यावत करून घ्यावे. नामनिर्देशन सुविधा बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे.

**Locker Holder (लॉकर धारक) :** आपण बँकेमध्ये घेतलेल्या लॉकरचा वर्षातून किमान एक वेळा वापर करावा अन्यथा सदर लॉकर Inoperative म्हणून गणले जाते. तसेच लॉकर भाडे अदा केलेले नसल्यास त्वरित अदा करावे. उपरोक्त कारणास्तव आपणास लॉकर वापरासाठी अडथळा निर्माण होऊ शकतो.

**ReKYC :** भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ठराविक कालावधीनंतर बँकेतील आपल्या खात्यांसाठी देण्यात आलेल्या KYC कागदपत्रांचे अद्ययावतीकरण करणे बंधन कारक आहे व CKYC साठी नोंदणी करणेही बंधनकारक आहे. KYC अद्यावतीकरणाबाबत बँकेमार्फत वेळोवेळी आपल्या खात्याशी संलग्नित संपर्क क्रमांकावर (Mobile Number) SMS द्वारे कळविण्यात येत आहेच तरीसुद्धा बँकेच्या नजीकच्या शाखेस त्वरित भेट देऊन KYC अद्यावतीकरणाबाबत माहिती प्राप्त करावी व आवश्यक असल्यास पूर्ण कागद्पत्रासहित बँकेच्या विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा व आपली KYC बँकेमध्ये अद्यावत असले बाबत खात्री करून घ्यावी. ज्या खात्यांमध्ये दिनांक 31 मार्च 2025 अखेर KYC चे अद्ययावतीकरण करणे बाकी असेल अश्या खात्यामधील व्यवहार नाईलाजास्तव थांबवावे लागतील याची नोंद घ्यावी.

**CKYC: Centralised KYC -** ज्या ग्राहकांकडे अद्यावत CKYC क्रमांक असतील अश्या ग्राहकांनी त्याची प्रत बँकेमध्ये सादर करावी. अति महत्वाचे - ज्या KYC कागदपत्रांची झेरॉक्स बँकेमध्ये सादर करीत आहेत त्या कागदपत्रांचे मूळ दस्त (Original Document) सोबत ठेवावेत. बँक कर्मचारी /अधिकारी यांनी कागदपत्रांची पडताळणी केलेनंतर आपले मूळ दस्त आपण त्वरित आपल्या ताब्यात घ्यावेत. आपले खाते आमच्या बँकेसाठी बहुमूल्य आहे.

आपल्या खात्यामध्ये कोणत्याही अडथळ्याशिवाय व सुरक्षित व्यवहार सुरु रहावे यासाठी बँकेस सहकार्य करावे हि नम्र विनंती. अधिक माहितीकरिता बँकेच्या नजीकच्या शाखेस भेट द्यावी किंवा ग्राहक संवाद कक्षाशी - 9028051400 या क्रमांकावर संपर्क करावा अथवा - www.sundarlalsawjibank.com या बँकेच्या अधिकृत Website वर भेट द्यावी.

जिंतूर - दिनांक: 01/01/2025

**मुख्य कार्यकारी अधिकारी**